# महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
# राज्य सेवा (मुख्य) परीक्षा-२०१४
# घोषणा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दिनांक ३० व ३१ मे आणि १ जून, २०१४ या कालावधीत घेण्यात आलेल्या **राज्य सेवा (मुख्य) परीक्षा-२०१४** च्या लेखी परीक्षेचा निकाल दिनांक **९ डिसेंबर, २०१४** रोजी जाहिर करण्यात आला आहे. लेखी परीक्षेत अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या **मुलाखतीचा मुंबई केंद्रावरील कार्यक्रम व पुणे केंद्रावरील अंशत: कार्यक्रम जाहिर केला आहे. उर्वरित मुलाखत कार्यक्रम लवकरच जाहिर केला जाईल, याची अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांनी कृपया नोंद घ्यावी.**

२. लेखी परीक्षेद्वारे मुलाखतीसाठी अर्हताप्राप्त ठरलेल्या सर्व उमेदवारांनी प्रस्तुत परीक्षेच्या अधिसूचनेत अधिसूचीत केलेल्या पदांसाठी पसंतीक्रम (Preference Number) त्यांच्या प्रोफाईलमध्ये पाठविलेल्या नमुन्यात (Format) आयोगास दिनांक **२९ डिसेंबर, २०१४** सायंकाळी ५.३० पर्यंत पाठविणे आवश्यक आहे. विहित मुदतीत पसंतीक्रम न पाठविल्यास अधिसूचनेत पदे ज्या क्रमाने नमूद करण्यात आली आहेत, तोच पसंतीक्रम अशा उमेदवारांकरिता गृहीत धरला जाईल व याबाबत कोणतीही बाब तद्नंतर विचारात घेतली जाणार नाही.

३. **सहायक संचालक, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, गट-अ व सहायक प्रादेशिक परिवहन सेवा, गट-ब** या दोन पदांकरिता विशिष्ट शैक्षणिक अर्हता धारण करणे आवश्यक आहे. सदर शैक्षणिक अर्हतेबाबतची **टीप** पसंतीक्रम नमुन्यावर नमूद केली आहे. ती शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांनीच त्या पदासाठी आपला पसंतीक्रम दर्शवावा.

विजया पडते
उपसचिव (परीक्षा),
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.

मुंबई.
दिनांक:- २२ डिसेंबर, २०१४.